# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' राबविण्याबाबत.
**{बाजार विभाग}** नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या दुकानांचे बाजार विभाग द्वारे वसुल करण्यात येणारे वापर शुल्क चा भरणा संबंधीत व्यक्ती/व्यवसायिक द्वारा वेळीच भरण्यात येत नसल्याने संबंधीत व्यक्ती/व्यवसायिक यांच्या थकित रक्कमेत वाढ होत असून दंडाची रक्कमेत सुद्धा वाढ झालेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४३९ च्या तरतूदीनुसार वसुलीयोग्य असलेला खर्च मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला नाही तर, तो मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल, अशी तरतूद आहे. मालमत्ता कर थकित रक्कम वसूली करीता मालमत्ता कर थकित रक्कमेवर कराधान नियम क्र.४१ च्या अन्वये आकारलेली शास्ती रक्कम तसेच नियम क्र.५० च्या तरतूदी अन्वये आकारलेले शुल्क किंवा दंड कराधान नियम क्र.५१ च्या तरतूदी अंतर्गत स्वेच्छा निर्णयांचा वापर करुन मा. आयुक्त अभय योजना लागू करीत असतात, त्याच धर्तीवर मालमत्ता कर व्यतिरिक्त नागपूर महानगरपालिकेची वसुली योग्य असलेल्या इतर मागणी ची थकित रक्कम वसुली करीता सुद्धा उक्त थकित मागणी रक्कमेवरील शास्ती/दंड/व्याज रक्कम माफ करणेबाबत स्वेच्छा निर्णय घेवून **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** लागू करणेचे प्रस्ताव आहे.

उक्त प्रकरणी नागपूर महानगरपालिकेचे कायद्याचे वरीष्ठ सल्लागार श्री. एस. के. मिश्रा यांचे अभिमत घेतलेले असून अभिमत पुढीलप्रमाणे आहे.

"In so far as announcing an amenity scheme for the purpose of remitting the penalty chargeable on non-payment of user charges, the same being policy decision of Corporation. Hence the same can be framed by the Corporation. I see no legal impediment under MMC Act for the same. If necessary, the approval can be taken from the State."

**१. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा कालावधी :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा कालावधी हा दिनांक १६ जुन २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ असा राहील.

**२. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची व्याप्ती :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' अंतर्गत **दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत** थकबाकी असणाऱ्या तसेच चालू आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चा बाजार विभागाचा वापर शुल्क नागपूर महानगरपालिका निधीत जमा न केल्याने चालू आर्थिक वर्षाकरीता थकीत झालेल्या व्यक्ती/व्यवसायिक या योजनेचा लाभ घेता येईल.

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' लागू असलेल्या काळात म.न.पा. दुकान/ओटे/जागा चे वापर करीत असलेल्या व्यक्ती/व्यवसायिक द्वारा नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या वापर शुल्क रक्कमेचे १००% अधिदान खालीलप्रमाणे केल्यास, थकीत रक्कमेवर प्रतिमाह

२% प्रमाणे आकारण्यात आलेली शास्ती/दंड/व्याज व वसुलीचा खर्च पुढीलप्रमाणे माफ करण्यात येईल.

| तपशील | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत असलेल्या वापर शुल्काच्या थकित रक्कमेसह चालू आर्थिक वर्ष २०२५-२०२६ ची सुद्धा वापर शुल्क रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा केल्यास | दि.१६ जुन, २०२५ ते दि.३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत | शास्ती/दंड/व्याज रक्कम ची रक्कम **८० टक्के** माफ |

**३. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील :**

नागपूर महानगरपालिकेचे बाबाजर विभागाचे वापर शुल्क ची थकित रक्कम व वसुलीचा खर्च वर नमुद कालमर्यादेनुसार ८०% माफ करण्यात येईल.

**४. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा :**

सदर योजना ही वर नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रकमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.

**५. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी :**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदहू योजनेतील लाभधारक व्यक्ती/व्यवसायिक बाजार वापर शुल्क करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील. **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** चा लाभधारक भविष्यात बाजार वापर शुल्क रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील.

**६. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४३९ च्या तरतुचा वापर करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम क्र.५१ नुसार 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' च्या कालावधीपर्यंत (दिनांक १६ जुन २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५) या कालावधीसाठी उपायुक्त (महसूल), सहाय्यक आयुक्त (बाजार) आणि बाजार अधिक्षक यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

बाजार विभाग, नागपूर महानगरपालिका द्वारा थकित वापर शुल्क वसुली करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ८१-ब (१) ची कार्यवाही अंतर्गत रिकामे करुन घेतलेले दुकान करीता सुद्धा 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा लाभ देणेस्तव कलम ८१(ब)(६)

च्या तरतूदी अंतर्गत कार्यवाही करणेचे अधिकारअतिरिक्त आयुक्त (सामान्य) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

**७. कार्यवाही विषयक बाबी :**

बाजार विभागाने 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.

**८. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची जाहिरात व प्रसिध्दी :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' राबविण्यासाठी नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत पुढीलप्रमाणे विविध माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येईल.

१. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येईल.

२. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात येईल.

३. सर्व झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर, उद्दयानात 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे फलक लावण्यात येईल.

४. महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या प्रत्येक बसेस वर 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे फलक लावण्यात येईल.

५. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

६. प्रत्येक वार्डातील प्रत्येक गल्लीत ऑटो फिरवून ध्वनीक्षेपणाद्वारे 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

७. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मालमत्ताधारकांच्या घरी माहितीपत्रके वाटून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची माहिती देण्यात येईल.

८. Bulk SMS System द्वारे नागरीकांना SMS पाठवून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची माहिती देण्यात येईल.

९. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

१०. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** राबविण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 25/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 17/06/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), बाजार विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या दुकानांचे बाजार विभाग द्वारे वसुल करण्यात येणारे वापर शुल्क चा भरणा संबंधीत व्यक्ती/व्यवसायिक द्वारा वेळीच भरण्यात येत

नसल्याने संबंधीत व्यक्ती/व्यवसायिक यांच्या थकित रक्कमेत वाढ होत असून दंडाची रक्कमेत सुद्धा वाढ झालेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४३९ च्या तरतूदीनुसार वसुलीयोग्य असलेला खर्च मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला नाही तर, तो मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल, अशी तरतूद आहे. मालमत्ता कर थकित रक्कम वसूली करीता मालमत्ता कर थकित रक्कमेवर कराधान नियम क्र.४१ च्या अन्वये आकारलेली शास्ती रक्कम तसेच नियम क्र.५० च्या तरतूदी अन्वये आकारलेले शुल्क किंवा दंड कराधान नियम क्र.५१ च्या तरतूदी अंतर्गत स्वेच्छा निर्णयांचा वापर करुन मा. आयुक्त अभय योजना लागू करीत असतात, त्याच धर्तीवर मालमत्ता कर व्यतिरिक्त नागपूर महानगरपालिकेची वसुली योग्य असलेल्या इतर मागणी ची थकित रक्कम वसुली करीता सुद्धा उक्त थकित मागणी रक्कमेवरील शास्ती/दंड/व्याज रक्कम माफ करणेबाबत स्वेच्छा निर्णय घेवून **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** लागू करणेचे प्रस्ताव आहे.

उक्त प्रकरणी नागपूर महानगरपालिकेचे कायद्याचे वरीष्ठ सल्लागार श्री. एस. के. मिश्रा यांचे अभिमत घेतलेले असून अभिमत पुढीलप्रमाणे आहे.

"In so far as announcing an amenity scheme for the purpose of remitting the penalty chargeable on non-payment of user charges, the same being policy decision of Corporation. Hence the same can be framed by the Corporation. I see no legal impediment under MMC Act for the same. If necessary, the approval can be taken from the State."

**१. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा कालावधी :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा कालावधी हा दिनांक १६ जुन २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ असा राहील.

**२. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची व्याप्ती :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' अंतर्गत **दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत** थकबाकी असणाऱ्या तसेच चालू आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चा बाजार विभागाचा वापर शुल्क नागपूर महानगरपालिका निधीत जमा न केल्याने चालू आर्थिक वर्षाकरीता थकीत झालेल्या व्यक्ती/व्यवसायिक या योजनेचा लाभ घेता येईल.

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' लागू असलेल्या काळात म.न.पा. दुकान/ओटे/जागा चे वापर करीत असलेल्या व्यक्ती/व्यवसायिक द्वारा नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या वापर शुल्क रक्कमेचे १००% अधिदान खालीलप्रमाणे केल्यास, थकीत रक्कमेवर प्रतिमाह २% प्रमाणे आकारण्यात आलेली शास्ती/दंड/व्याज व वसुलीचा खर्च पुढीलप्रमाणे माफ करण्यात येईल.

| तपशील | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत असलेल्या वापर शुल्काच्या थकित रक्कमेसह चालू आर्थिक वर्ष २०२५-२०२६ ची सुद्धा वापर शुल्क रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा केल्यास | दि.१६ जुन, २०२५ ते दि.३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत | शास्ती/दंड/व्याज रक्कम ची रक्कम **८० टक्के** माफ |

**३. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील :**

नागपूर महानगरपालिकेचे बाबाजर विभागाचे वापर शुल्क ची थकित रक्कम व वसुलीचा खर्च वर नमुद कालमर्यादेनुसार ८०% माफ करण्यात येईल.

**४. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा :**

सदर योजना ही वर नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रकमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.

**५. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी :**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुनर्निरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुनर्निरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदर्हू योजनेतील लाभधारक व्यक्ती/व्यवसायिक बाजार वापर शुल्क करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील. **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** चा लाभधारक भविष्यात बाजार वापर शुल्क रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील

**६. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४३९ च्या तरतुचा वापर करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम क्र.५१ नुसार 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' च्या कालावधीपर्यंत (दिनांक १६ जुन २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५) या कालावधीसाठी उपायुक्त (महसूल), सहाय्यक आयुक्त (बाजार) आणि बाजार अधिक्षक यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

बाजार विभाग, नागपूर महानगरपालिका द्वारा थकित वापर शुल्क वसुली करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ८१-ब (१) ची कार्यवाही अंतर्गत रिकामे करुन घेतलेले दुकान करीता सुद्धा 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चा लाभ देणेस्तव कलम ८१(ब)(६) च्या तरतूदी अंतर्गत कार्यवाही करणेचे अधिकारअतिरिक्त आयुक्त (सामान्य) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.

**७. कार्यवाही विषयक बाबी :**

बाजार विभागाने 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.

**८. 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची जाहिरात व प्रसिध्दी :**

'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' राबविण्यासाठी नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत पुढीलप्रमाणे विविध माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येईल.

१. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येईल.
२. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात येईल.
३. सर्व झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर, उद्यानात 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे फलक लावण्यात येईल.

४. महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या प्रत्येक बसेस वर 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे फलक लावण्यात येईल.

५. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

६. प्रत्येक वार्डातील प्रत्येक गल्लीत ऑटो फिरवून ध्वनीक्षेपणाद्वारे 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

७. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मालमत्ताधारकांच्या घरी माहितीपत्रके वाटून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची माहिती देण्यात येईल.

८. Bulk SMS System द्वारे नागरीकांना SMS पाठवून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची माहिती देण्यात येईल.

९. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' ची प्रसिध्दी देण्यात येईल.

१०. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन 'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५' चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे **'बाजार विभाग वापर शुल्क अभय योजना-२०२५'** राबविण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.